# महाराष्ट्र शासन

## मुख्य वनसंरक्षक (प्रा.), कोल्हापूर यांचे कार्यालय

**"वनवर्धन", ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६००३**

महाराष्ट्र वन विभाग
Office - 0231/2653632,
E-mail ID –
ccftkolhapur@mahaoforest.gov.in
ccftkolhapur@gmail.com

क्रमांक कक्ष-६/नोसेल/रस्ता/२४-२५/११६७
कोल्हापूर -४१६००३ दिनांक - ११/११/२०२४.

**प्रति,**
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी,
महाराष्ट्र राज्य, नागपूर.

**विषय :** Diversion of 2.15 ha. Reserved forest land and Protected Forest land in favour of PWD Special Project (P.W.) Division, Kolhapur for Improvement to Kerli-Kototi-Nandgaon-Nandari Road SH-191 (Km 00/00 to Km 296/500) Part of Kerli Phata To Nandari Forest Area in Taluka-Panhala & Shahuwadi, District-Kolhapur in the State of Maharashtra.reg.

**संदर्भ :**१. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र कक्ष-१७/नोडल कोल्हापूर/आयडी-११५१५६/१२६०/२०२४-२५ दिनांक २२.०८.२०२४.
२. उपवनसंरक्षक कोल्हापूर यांचेकडील पत्र क्र.अ/वसं/२४-२५/१०२९ दिनांक २९.११.२०२४

विषयांकित प्रकरणी वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत सदर प्रस्तावामध्ये संदर्भ क्र.१ अन्वये प्रकल्प यंत्रणेकडून देण्यात आलेले पर्यायी क्षेत्र भारतीय वन अधिनियम, १९२७ अंतर्गत संरक्षित/राखीव वन म्हणून अधिसूचित झाले किंवा कसे याबाबत त्रुटी उपस्थित करण्यात आलेल्या आहेत.

संदर्भ क्र.२ अन्वये उपवनसंरक्षक कोल्हापूर यांनी त्रुटी पूर्तता अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे. (प्रत संलग्न) प्रकल्प यंत्रणेकडून देण्यात आलेले मौजे मांजरे, गट नं. ४७ मधील २.१५ हे. वनेत्तर क्षेत्र महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ, दिनांक ७.०२.२०२४ अन्वये भारतीय वन अधिनियम, १९२७ च्या कलम ४ अन्वये राखीव वन म्हणून प्रस्तावित करण्यात आलेले आहे. तसेच उक्त क्षेत्राचे अधिकारांचे बाबतीत चौकशी करण्याकरीता आणि अधिकारांचे स्वरूप व व्याप्ती निर्धारित करण्याकरीता वन जमाबंदी अधिकारी, भोर स्थित पुणे यांची नियुक्ती करण्यात आलेली असून पुढील कार्यवाही त्यांचे स्तरावरून चालू आहे.

संदर्भ क्र.२ अन्वये उपवनसंरक्षक कोल्हापूर यांनी सादर केलेला अहवाल तीन प्रतीमध्ये पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी यासोबत सविनय सादर करण्यात येत आहे. तरी सदर प्रस्तावावर आपले स्तरावरून पुढील संस्करण होणेस विनंती आहे.

**सहपत्र :** वरीलप्रमाणे

(आर.एम. रामानुजम)
**मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),**
**कोल्हापूर.**

**प्रतिलिपी :**उपवनसंरक्षक कोल्हापूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.
**प्रतिलिपी :** कार्यकारी अभियंता,सा.बां. विभाग, कोल्हापूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

वन आणि वन्यजीव संरक्षण काळाची गरज
दुरध्वनी क्रमांक - २६५११९१
E-mail - dycfkop2007@gmail.com

महाराष्ट्र शासन

**उप वनसंरक्षक कोल्हापूर वन विभाग कोल्हापूर यांचे कार्यालय**

*वनवर्धन* इमारत, पोस्ट ऑफीस समोर, ताराबाई पार्क, कोल्हापूर

जा.क्र.अ/वनसंवर्धन/२०२४-२५/७०२८ कोल्हापूर, दिनांक :- २८/११/२०२४.

प्रति,
मा. मुख्य वनसंरक्षक (प्रा.),
कोल्हापूर

वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर यांचे कार्यालय ४१६ ००३.
7853
29 NOV 2024
क्रमांक- स्वाक्षरी

**विषय :- Proposal under Forest (Conservation) Act, १९८०.**
Diversion of forest land for Improvement to Kerli-Kototi-Nandgaon-Nandari Road SH-१९१ (Km ००/०० to Km २९/५००) Part of Kerli Phata To Nandari Forest Area required -२.१५ ha. in Kolhapur District.

**संदर्भ :-**
१. केंद्र शासन पत्र क्रं. एफसी-१/एमएच-२६९/१२३३७, दि. १७-१०-२०२३.
२. या कार्यालयाचे पत्र क्रं.अ/वनसंवर्धन/४५४/२४-२५, दि. १८-७-२०२४.
३. मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र.कक्ष-१७/नोसेल/आयडी-११५१५६/१२६०, दि. २२-०८-२०२४.

विषयांकित प्रकरणी, वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत Diversion of forest land for Improvement to Kerli-Kototi-Nandgaon- Nandari Road SH-१९१ (Km ००/०० to Km २९/५००) Part of Kerli Phata to Nandari Forest Area required -२.१५ ha. प्रस्तावात संदर्भिय पत्रान्वये मौ. मांजरे गट नं. ४७ बिगर वनजमीन भारतीय वनअधिनियम १९२७ च्या कलम ४ किंवा कलम २९ अन्वये अधिसूचीत झाले असल्यास त्याची प्रत संदर्भिय पत्र क्रं. १ अन्वये सादर करणेबाबत कळविण्यात आलेले होते.

संदर्भिय पत्राचे निर्देशनानूसार मौ. मांजरे गट नं. ४७ बिगर वनजमीन महूसल व वनविभाग मंत्रालय, मुंबई अधिसूचना क्रमांक एफएलडी-२३/२०२३/ प्र.क्र. ३५८/फ-३ दि. ७-२-२०२४ व भारतीय वनअधिनियम, १९२७ (१९२७ चा १६) च्या कलम ४ अन्वये राखीव वन म्हणून घोषित केलेबाबतचा उल्लेख करून अहवाल संदर्भिय पत्र क्रं. २ अन्वये सादर करण्यात आलेला होता, याबाबत मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांनी संदर्भिय पत्र क्रं. ४ अन्वये चुकीची माहिती सादर केले असलेबाबत कळविण्यात आलेले होते.

वरील विषयाचे अनूषंगाने कळविण्यात येते की, मौ. मांजरे गट नं. ४७ बिगर वनजमीन महूसल व वनविभाग मंत्रालय, मुंबई अधिसूचना दिनांक ७ फेब्रुवारी २०२४ अन्वये व भारतीय वनअधिनियम, १९२७ (१९२७ चा १६) च्या कलम ४ अन्वये राखीव वन म्हणून प्रस्तावीत केली असून कलम २० खाली सदर बिगर वन जमीन घोषित करणेबाबतची कार्यवाही वनजमा बंदी अधिकारी, पुणे यांचेकडून सूरू असून राखीव वन घोषित होताच त्याची प्रत सादर करण्याची तजबीज ठेवण्यात आलेली आहे.

सोबत - वरीलप्रमाणे.

(जी गूरूप्रसाद)
उप वनसंरक्षक
कोल्हापूर वनविभाग, कोल्हापूर.

प्रतिलिपी - कार्यकारी अभियंता विशेष प्रकल्प (सां.बा.) विभाग, कोल्हापूर यांना माहितीसाठी.

## महसूल व वन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ७ फेब्रुवारी २०२४.

### अधिसूचना

**भारतीय वन अधिनियम, १९२७.**

क्रमांक एफएलडी-२३/२०२३/प्र.क्र.३५८/फ-३.—भारतीय वन अधिनियम, १९२७ (१९२७ चा १६) च्या कलम ४ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे **कोल्हापूर जिल्ह्यातील शाहुवाडी तालुक्यातील** सोबतच्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेली जमीन राखीव वन म्हणून स्थापित करण्याबाबत प्रस्तावीत असल्याचे घोषित करीत आहे :—

### अनुसूची

तालुका शाहुवाडी, जिल्हा कोल्हापूर

| अ. क्र. | गावाचे नाव | सर्व्हे नं. / गट नं. | एकूण क्षेत्र (हे.) | चतु:सीमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | उत्तर | पूर्व | दक्षिण | पश्चिम |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | **मांजरे** | ४७ भाग | २.१५ | गट नं. ४७ भाग | वन गट नं. ४७ भाग | वन गट नं. ४७ भाग | गट नं. ४७ भाग |
| | | **एकूण** | **२.१५** | | | | |

२. उक्त जमिनीस किंवा त्यावर असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या कथित अधिकारांच्या बाबतीत चौकशी करण्याकरिता आणि त्या अधिकारांचे, स्वरूप व व्याप्ती निर्धारित करण्याकरिता याच कलमाच्या खंड (क) अन्वये **वन जमाबंदी अधिकारी, भोर स्थित पुणे** यांची वन जमाबंदी अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहेत.

३. उक्त अधिनियमाच्या कलम १७ अन्वये महाराष्ट्र शासन याद्वारे कलमे ११, १२, १५ व १६ अन्वये वन जमाबंदी अधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही आदेशांवर करण्यात आलेल्या अपिलांवर सुनावणी करण्याकरिता **जिल्हाधिकारी, कोल्हापूर** यांची नियुक्ती करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. रविकिरण गोवेकर,**
मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय).

## REVENUE AND FOREST DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated 7th February 2024.

*NOTIFICATION*

Indian Forest Act, 1927.

No. FLD-23/2023/C.R.358/F-3.—In exercise of the powers conferred by Section 4 of the Indian Forest Act, 1927 (XVI of 1927), the Government of Maharashtra is pleased to declare that it is proposed to constitute the land in the **Shahuwadi Taluka of the Kolhapur District**, specified in the schedule hereto annexed as a Reserved Forest :—

*Schedule*

Taluka Shahuwadi, District Kolhapur

| Sr. No. | Village | Sur. No./ Gat. No. | Area (Ha.) | BOUNDARIES | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | North | East | South | West |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) |
| 1 | **Manjre** | 47 Pt. | 2.15 | Gat. No. 47 Pt. | Forest Gat. No. 47 Pt. | Forest Gat. No. 47 Pt. | Gat. No. 47 Pt. |
| | | **Total** | **2.15** | | | | |

2. **Forest Settlement Officer, Bhor at Pune** is hereby appointed, under clause (c) of the same section, to be the Forest Settlement Officer to enquire into and determine the existence, nature and extent of any rights alleged to exist in favour of any person in or over this land.

3. Under section 17 of the said Act, the Government of Maharashtra is also pleased to appoint the **Collector of Kolhapur District** to hear appeals from any orders passed by the said Forest Settlement Officer under sections 11, 12, 15 and 16 of the said Act.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

Dr. RAVIKIRAN GOVEKAR,
Chief Conservator of Forest (Mantralaya).

**वन जमाबंदी अधिकारी,भोर स्थित पुणे यांचे कार्यालय,**
**वनभवन मेंढी फार्म जवळ,गोखलेनगर पुणे 411016**
फोन नं 02025662925 Email- ID- forestsettlementofficerbhor@gmail.com

जा. क्र.वजअ /जमीन/ 261/2024
पुणे दिनांक - 10/12/2024

**भारतीय वन अधिनियम, 1927 चे कलम - 6 प्रमाणे**
**जाहीरनामा**

ज्या अर्थी भारतीय वन अधिनियम 1927 च्या कलम 4 प्रमाणे महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ, अधिसुचना क्रमांक एफएलडी-23/2023/प्र.क्र.358/फ-3,दि. 7 फेब्रुवारी 2024 अन्वये खालील गावातील जमिनी सदर अधिनियमाच्या कलम 20 प्रमाणे राखीव वन म्हणून गठीत करणे करिता जाहीर झाल्या आहेत. खाली सही करणार यांची सदर अधिनियमाच्या कलम 4 (क) अन्वये चौकशी करणेसाठी नेमणूक झाली आहे.

**त्या अर्थी वन जमाबंदी अधिकारी, भोर स्थित पुणे** यांचे कडून भारतीय वन अधिनियम, 1927 च्या कलम 6 प्रमाणे जाहीरनामा काढणेत येत आहे की, **मौजे-मांजरे, तालुका- शाहुवाडी, जिल्हा- कोल्हापूर** येथील खाली नमूद केलेल्या जमिनी राखीव वन म्हणून गठीत करण्या करिता जाहीर झाल्या आहेत.

| सर्व्हे नं./गट क्रमांक | एकूण क्षेत्र | चतु.सीमा | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | उत्तर | पूर्व | दक्षिण | पश्चिम |
| 47 भाग | 2.15 | गट. न. 47 भाग | वन गट. न. 47 भाग | वन गट. न. 47 भाग | वन गट. न. 47 भाग |
| **एकूण** | 2.15 | | | | |

**अ)**सदर जमिनीचे राखीव वनात रूपांतर झाल्यानंतर त्या जमिनीत अगर जमिनीवर शासनाचे परवानगी शिवाय कोणालाही कोणत्याही प्रकारचा हक्क प्रस्थापित करता येणार नाही.

**ब)** कलम 15 प्रमाणे काही जमिनी गुरे चरणी करिता किंवा वन उत्पन्नाकरिता हक्क चालू ठेवण्यात आले असतील असे हक्क शासनाचे परवानगी शिवाय कोणालाही आदा, विकता, पट्ट्याने, गहाणाने किंवा अन्य प्रकारे तबदील करता येणार नाहीत.

**क)** सदर नियोजित राखीव वनातील सार्वजनिक / खाजगी पायवाटा अगर पाण्याचे हक्क शासनाची आगाऊ परवानगी घेऊन संबंधीत वन अधिकारी त्या ऐवजी दुस-या ठिकाणी सोयीस्करपणे हयाच हक्काची पूर्तता करून बदलून देऊ शकतील.

**ड)** शासनाची कलम 4 प्रमाणे अधिसूचना निघाल्याचे तारखेपासून कोणालाही सदर जमिनीत मशागत, वहिवाट अगर अन्य कारणासाठी कब्जा करता येणार नाही व अशा प्रकारे मशागत,

वहिवाट कब्जा आढळून आल्यास तो कलम 26 प्रमाणे गुन्हा होऊन संबंधीत इसम / संस्था शिक्षेस पात्र राहील.

**इ)** या शिवाय सर्व लोकांना असे कळविण्यात येते की, वरील जमिनीत जे काही वैयक्तिक अगर सार्वजनिक हक्क (उदा. रस्ता, पायवाट, गुरेचरण, देवस्थान, पाणी वगैरे) अस्तित्वात असतील त्या बद्दलचे पुराव्यासह निवेदन या कार्यालयाकडे दिनांक- 13/03/2024 पूर्वी पोहोचेल असे टपालाने पाठवावे अगर समक्ष आणून दयावेत. सदर हक्काबाबत निवेदन देतेवेळी कोणत्या प्रकारचे हक्क राखून ठेवणे जरूर आहे त्याचा स्पष्ट खुलासा करावा. तसेच या हक्काबाबत काही नुकसान भरपाई मागण्याची असेल तर त्याचा उल्लेख करावा.

**( निलप्रसाद चव्हाण )**
**उपजिल्हाधिकारी तथा**
**वन जमाबंदी अधिकारी**
**भोर स्थित पुणे**

प्रत:-
1. मा. मुख्य वनसंरक्षक (प्रा) कोल्हापूर यांना माहितीसाठी सादर.
2. मा.उपवनसंरक्षक (प्रा) **कोल्हापूर** यांजकडे माहिती व पुढील कार्यवाही साठी सादर.
3. तहसीलदार **शाहुवाडी**– जि. कोल्हापूर यांचेकडे माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाही साठी रवाना.
4. वनपरिक्षेत्र अधिकारी शाहुवाडी, **ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर** यांचेकडे माहिती साठी व योग्य त्या कार्यवाही साठी रवाना.
5. गावकामगार तलाठी **मौजे-मांजरे, तालुका- शाहुवाडी, जिल्हा- कोल्हापूर** सदरचा जाहीरनामा गावी दवंडीने प्रसिध्द करून तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.
6. सरपंच/ग्रामसेवक, ग्रामपंचायत **मौजे-मांजरे, तालुका- शाहुवाडी, जिल्हा- कोल्हापूर** यांचेकडे सदरचा जाहीरनामा नोटीस बोर्डावर डकवून प्रसिध्द करावा व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.
7. पोलिस पाटील **मौजे-मांजरे, तालुका- शाहुवाडी,जिल्हा- कोल्हापूर** यांचेकडे माहितीसाठी रवाना.